इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन
सर्वे नं.७७०/३, बकरे ॲव्हेन्यू, गल्ली क्र.७, कॉसमॉस बँकेच्या समोर, भांडारकर रोड, पुणे ४११००५.
रजिस्ट्रेशन नं.- महाराष्ट्र/१७४/२००६/पुणे
फोन :- २५६६६०४७

## थेट मुलाखत (Walk In Interview)

पुणे महानगरपालिका, इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) कार्यक्रमांतर्गत ५४ UPHC व १५ वा वित्त आयोग अंतर्गत १२५ आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्राकरिता खालील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांना योग प्रशिक्षक पदाच्या थेट मुलाखतीसाठी बोलविण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम | मानधन | कमाल वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | योग प्रशिक्षक | र. रु. २५०/- प्रत्येक योग सत्र या प्रमाणे देय राहील. | १८ ते ४५ | नोंदणीकृत संस्थेचे योग प्रशिक्षक असल्याचे प्रमाणपत्र, १० वी परीक्षा उत्तीर्ण | १७९ |

### अटी व शर्ती

१. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोगांतर्गत भरण्यात येणाऱ्या उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

२. सदरील पदे एन. यु. एच. एम. समिती अंतर्गत राहतील. त्याचा पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३. सदर पदे निव्वळ मानधन तत्वावर रु. २५०/- प्रती योग सत्र या दराने केवळ दि. ३१/०३/२०२५ या कालावधीपर्यन्तच भरावयाचे असून पुढील वर्षात प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडयात सत्र संख्या मंजूर नसल्यास अथवा प्रकल्प बंद होताच आपोआप संपुष्टात येईल. सन २०२४-२५ च्या कृती आराखडयामध्ये मंजूर होणाऱ्या योगसत्रांच्या संख्येनुसार नियुक्त होणाऱ्या योगशिक्षकांना योग सत्रे विभागून देण्यात येतील.

४. उपरोक्त नमूद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास पहिल्या १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय आरोग्य अधिकारी , पुणे मनपा यांचा राहील.

५. मुलाखतीला जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील पात्र गुण व अनुभवाचे गुण यांचे आधारे गुणांचा कट ऑफ लावून त्यानुसार मुलाखती घेण्यात येतील.

६. मुलाखतीसाठी उमेदवारांनी खालील कागदपत्रे घेवून स्वखर्चाने मुलाखतीस हजर रहावे.

७. अ) आधार कार्ड/ओळखपत्र ब) मिनिस्ट्री ऑफ आयुष अथवा योगा सर्टिफिकेशन बोर्ड अंतर्गत नोंदणीकृत संस्थेचे,मान्यताप्राप्त विद्यापीठाचे योग प्रशिक्षक असल्याचे प्रमाणपत्र क)१० वी ची मार्कलिस्ट ड) शासकीय व नोंदणीकृत खाजगी संस्थेचे, योग प्रशिक्षकाचे प्रमाणपत्र आवश्यक.

८. शासकीय अनुभव धारकास प्राधान्य देण्यात येईल.

९. सदर पदासाठी सामाजिक आरक्षण लागू राहणार नाही.

१०. मुलाखती दरम्यान उमेदवारास योगाचे प्रात्यक्षिक करावे लागेल, त्यानुसार मूल्यांकन करण्यात येईल.

११. निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मा. अति. आयुक्त (ज), पुणे महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

१२. दि. २४/१२/२०२४ रोजी, दुपारी ०५:०० वाजेपर्यंत इच्छुक उमेदवारांनी आपली वरीलप्रमाणे कागदपत्रे इंटीग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन, स. क्र. ७७०/३, बकरे अॅव्हेन्यू, गल्ली क्र, ७, कॉसमॉस बँकेच्या समोर, भांडारकर रोड, पुणे ४११००५ येथील कार्यालयामध्ये सादर करावयाची आहेत. **मुलाखतीची तारिख, वेळ व ठिकाण .आपणांस दूरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने स्वतः स्वखर्चाने मुलाखतीस हजर रहावे.**

सही /- 16/12/2024
(डॉ. मनिषा विनोद नाईक )
सहा. आरोग्य अधिकारी तथा सहसचिव
आय. एच. एफ. डब्ल्यू. सोसायटी
फॉर पी. एम. सी.

सही /- 16/12/2024
(डॉ. निना बोराडे )
आरोग्य अधिकारी तथा सचिव
आय. एच. एफ. डब्ल्यू. सोसायटी
फॉर पी. एम. सी

जाहिरात क्र. दि. / /२०२४

# उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
तथा अध्यक्ष, एक्झिक्युटीव्ह कमिटी
आय.एच.एफ.डब्ल्यू.सोसायटी फॉर पीएमसी
पुणे – ४११००५.

विषयः– जाहिरात क्रः------------------ नुसार मानधनावरील ------------------------------------- या पदासाठी अर्ज

मा.महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी मनपाचे दवाखान्यामध्ये ३१/०३/२०२५ पर्यंत निव्वळ मानधनावर -------------------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

१. संपूर्ण नाव :-----------------------------------------------------------
२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------
:-----------------------------------------------------------
३. ई–मेल आयडी :---------------------------------- मोबाईल क्रमांकः-----------------
४. जन्म तारीख :– दिनांक / /
५. लिंग :– पुरुष / स्त्री

६. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील :–

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

७. तांत्रिक व इतर अर्हता तपशील :– १) -----------------------------------------------
२) -----------------------------------------------

९. अनुभवाचा तपशील :–

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दूरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यात पात्र राहिन व त्याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :–
दिनांक :– / /२०

अर्जदाराची सही -------------------------
अर्जदाराचे नाव -------------------------

सहपत्रे :– **अर्जासोबत** जाहिरातीमध्ये दिलेले सर्व कागदपत्रे **जोडणे आवश्यक आहे.**